ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 8 | APRIL - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतातील महिला शिक्षण: प्रगतीचा आढावा आणि आव्हानात्मक वाटचाल



[१] लक्ष्मण सुरवसे,[२] स्मितासुरवसे
[१] सहकेळकर कला, वाणिज्यआणीविज्ञान महाविद्यालय, देवगड, जिल्हा -सिंधुदुर्ग
[२] संतराऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ, जिल्हा-सिंधुदुर्ग

**गोषवारा:**

कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महिलांचे शिक्षण हा एक अपरिहार्य घटक आहे. सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांतील महिलांचे सक्रिय योगदान राष्ट्राच्या विकास प्रक्रियेला खऱ्या अर्थाने गती देते. समाज आणि राष्ट्र सक्षमीकरणात स्त्रियांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. शिक्षण हा स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता प्रत्येक मानवाचा मूलभूत आणि समान अधिकार आहे.

एकविसाव्या शतकातही विकसनशील देशांमधील महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक नाही. भारतासारख्या प्रगतिशील राष्ट्रात महिला साक्षरतेचा दर अद्याप ६५.४६% इतकाच मर्यादित आहे. शिक्षण केवळ महिलांचे सक्षमीकरणच करत नाही, तर त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि क्षमता विकसित करण्यासही मोलाचे साहाय्य करते.

याविवेचनात भारतातील स्त्री-शिक्षणाच्या विकासाचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये शिक्षणातील महत्त्वाचे टप्पे, प्रभावशाली समाजसुधारक, धोरणात्मक बदल आणि या क्षेत्राला कलाटणी देणारी निरंतर आव्हाने यांचे सविस्तर विश्लेषण केले आहे.

## प्रास्ताविक:

भारतातील स्त्री-शिक्षणाचा इतिहास हा प्रदीर्घ उपेक्षेच्या कालखंडापासून ते राष्ट्रउभारणीतील सक्रिय सहभागापर्यंतचा एक देदीप्यमान प्रवास आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांच्या जटिल परस्परसंबंधांमुळे स्त्रियांच्या शिक्षणामध्ये अनेक अडथळे निर्माण झाले होते. पण गेल्या काही शतकांतील सामूहिक आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या क्षेत्रात स्थित्यंतर घडून आली आहेत. आज भारतीय महिला केवळ वैयक्तिक स्तरावर सक्षम झाल्या नसून, त्या राष्ट्रीय विकासातही आपलाठसा उमटवत आहेत.

महिला शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट मुलींचे कौशल्य आणि ज्ञान वाढवणे आहे. सकारात्मक बदलासाठी मुली आणि महिलांना शिक्षण देणे खूप महत्वाचे आहे. आपल्या भारतीय संविधानात शिक्षण हा सर्वांसाठी समान अधिकार असल्याचे म्हटले आहे.

## प्राचीन भारत आणि वैदिक काळ:

प्राचीन भारतीय संस्कृती आणि वैदिक वाङ्मय यांचा अभ्यास केला असता, असे दिसून येते की त्याकाळी समाजात स्त्रियांना शिक्षणाचे समान अधिकार प्राप्त होते. ऋग्वेद काळातील समाज हा अधिक उदार आणि ज्ञाननिष्ठ होता.या कालखंडात अनेक स्त्रियांनी आपल्या बौद्धिक क्षमतेने समाजात मानाचे स्थान मिळवले होते. त्यांना 'ब्रह्मवादिनी' आणि 'सद्योद्वाहा' अशा दोन श्रेणींमध्ये विभागले जात असे.याकाळातगार्गीआणिमैत्रेयी यांचा उल्लेख प्रमुख्याने करावा लागेल.गार्गी ही एक महान तत्त्वज्ञ होती. राजा जनकाच्या दरबारात तिने ऋषी याज्ञवल्क्य यांच्याशी केलेला शास्त्रार्थ हा तिच्या अफाट

बुद्धिमत्तेचा आणि तार्किक क्षमतेचा पुरावा आहे.ऋषी याज्ञवल्क्य यांची पत्नी मैत्रेयी ही केवळ गृहिणी नव्हती, तर ती एक गंभीर विचारवंत होती. तिने भौतिक संपत्तीपेक्षा आत्मज्ञानाचे शिक्षण घेण्यास प्राधान्य दिले, जे त्या काळातील स्त्रियांच्या प्रगल्भ विचारांचे दर्शन घडवते.याशिवाय लोपामुद्रा, घोषा आणि विश्ववारा यांसारख्या अनेक ऋषिकांनी ऋग्वेदातील ऋचांच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले आहे.

दुर्दैवाने, उत्तर-वैदिक काळात भारतीय सामाजिक रचनेत आमूलाग्र बदल होऊ लागले. हळूहळू समाजात कर्मकांडांचे स्तोम माजले आणि वर्णव्यवस्था अधिक कडक झाली. याचा सर्वाधिक फटका स्त्रियांना बसला.बालविवाहाची प्रथा सुरू झाल्यामुळे मुलींना शिक्षणाऐवजी घरकामाच्या चौकटीत बंदिस्त केले गेले. स्त्रियांचे स्थान केवळ कुटुंबापुरते मर्यादित झाले आणि त्यांना पुरुषांच्या अधीन मानले जाऊ लागले.शिक्षणाचा अधिकार हिरावून घेतल्यामुळे स्त्रिया वैचारिक आणि आर्थिकदृष्ट्या परावलंबी झाल्या. ज्या समाजात स्त्रियांना 'अर्धांगिनी' म्हणून समान दर्जा होता, तिथे त्यांना दुय्यम स्थान दिले गेले.

या सामाजिक बदलांमुळे भारतात अनेक शतके शैक्षणिक विषमता टिकून राहिली. स्त्रियांना ज्ञानापासून वंचित ठेवल्यामुळे समाजाचा अर्धा भाग प्रगतीपासून दूर राहिला. मध्ययुगीन काळात ही स्थिती अधिकच खालावली, ज्यामुळे भारतीय स्त्री-शिक्षणाचा आलेख घसरत गेला.

## स्त्री-शिक्षण आणि समाजसुधारणेच्या युगाचा उदय:

१८ व्या शतकात ब्रिटीश वसाहतवादाच्या आगमनानंतर भारतीय समाजव्यवस्थेत स्थित्यंतराची प्रक्रिया सुरू झाली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी सुरुवातीला काही पावले उचलली, परंतु खऱ्या अर्थाने भारतीय समाजसुधारकांनी या चळवळीला 'स्वत्व' मिळवून दिले. पाश्चात्य उदारमतवादी विचारांच्या प्रभावातून भारतीय विचारवंतांना हे उमजले की, जोपर्यंत समाजाचा अर्धा भाग (स्त्रिया) अज्ञानाच्या अंधकारात आहे, तोपर्यंत राष्ट्राची प्रगती होणे अशक्य आहे.

या कालखंडात अनेक महान पुरुषांनी स्त्री-शिक्षणाचा आणि त्यांच्या हक्कांचा पुरस्कार केला.राजा राममोहन रॉय यांना 'आधुनिक भारताचे जनक' मानले जाते. त्यांनी केवळ सती प्रथेविरुद्ध लढा दिला नाही, तर स्त्रियांना वारसा हक्क आणि शिक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी मोठे जनमत तयार केले.ईश्वरचंद्र विद्यासागरयांनी बंगालमध्ये केवळ विधवा विवाहाचा पुरस्कार केला नाही, तर स्वखर्चाने मुलींसाठी अनेक शाळा स्थापन केल्या. स्त्री-शिक्षण हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता.

महाराष्ट्रातील समाजक्रांतीचे जनक महात्मा जोतिराव फुले यांनी हे ओळखले होते की, शूद्र आणि स्त्रियांच्या दातृत्वाचे मूळ हे अज्ञानात आहे. त्यामुळे त्यांनी शिक्षणाला क्रांतीचे शस्त्र बनवले.१८ व्या आणि १९ व्या शतकातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे १ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील भिडे वाड्यात सुरू झालेली मुलींची पहिली शाळा.महात्मा फुले यांनी आपल्या पत्नीला, सावित्रीबाईंना शिक्षित केले आणि त्यांना देशातील पहिल्या महिला शिक्षिका बनवले.त्याकाळी मुलींना शिकवणे हे धर्माच्या विरुद्ध मानले जाई. शाळेत जाताना सावित्रीबाईंवर शेण, दगड फेकले जात असत, तरीही त्यांनी आपला निश्चय ढळू दिला नाही. हे पाऊल भारतीय इतिहासातील एक 'मैलाचा दगड' ठरले आणिसनातनी विचारांच्या भिंती पाडून स्त्रियांसाठी ज्ञानाची कवाडे खुली  करण्याचे काम केले.

स्त्री-शिक्षणाच्या चळवळीत पंडिता रमाबाई यांचेही योगदान अत्यंत मोलाचे आहे.त्यांनी 'आर्य महिला समाजा'ची स्थापना केली आणि नंतर विधवा स्त्रियांसाठी 'शारदा सदन' सुरू केले.त्यांच्या अफाट विद्वत्तेमुळे त्यांना 'पंडिता' आणि 'सरस्वती' या पदव्यांनी गौरविण्यात आले होते. त्यांनी स्त्रियांना केवळ साक्षर न करता त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यावर भर दिला.

स्त्री-शिक्षणाच्या या चळवळीचा थेट परिणाम सामाजिक प्रथांवर झाला. शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये जागृती निर्माण झाली, ज्यामुळेबालविवाह प्रथेला विरोध झाला, सती प्रथा कायद्याने बंद करण्यासाठी बळ मिळाले आणिस्त्रियांच्या मानवी अधिकारांबद्दल समाजात मंथन सुरू झाले.

वसाहतकालीन सुधारणा चळवळींनी भारतीय शिक्षण पद्धतीचा पाया सर्वसमावेशक केला. जो अधिकार केवळ पुरुषांपुरता मर्यादित होता, तो मानवी अधिकार म्हणून स्त्रियांनाही मिळवून देण्यासाठी या काळात मोठे वैचारिक आणि प्रत्यक्ष युद्ध लढले गेले. आजच्या आधुनिक भारतातील सुशिक्षित महिला ही या सर्व थोर समाजसुधारकांच्या त्यागाची आणि संघर्षाची फलश्रुती आहे.

## स्वातंत्र्योत्तर कालखंड: स्त्री-शिक्षण आणि धोरणात्मक क्रांतीचा उदय

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, देशाला आधुनिक आणि प्रगत बनवण्यासाठी स्त्री-शिक्षण हा केंद्रबिंदू मानला गेला. भारतीय संविधानाने 'लिंग समानता' आणि 'शिक्षणाचा अधिकार' ही तत्त्वे स्वीकारली. संविधानातील कलम १५ आणि कलम २१-अ (नंतरच्या काळात समाविष्ट) यांनी स्त्री-पुरुषांमधील शैक्षणिक दरी मिटवण्यासाठी कायदेशीर आणि नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. शिक्षण हे केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन नसून ते सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणाचे प्रमुख माध्यम असल्याचे सरकारने मान्य केले.

१९५१ पासून सुरू झालेल्या पंचवार्षिक योजनांमध्ये महिला साक्षरतेचे प्रमाण वाढवण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या.प्राथमिक स्तरावर मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी मोफत शिक्षणाची सोय करण्यात आली. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मागास मुलींसाठी विशेष शिष्यवृत्ती आणि माध्यान्ह भोजन यांसारख्या योजना सुरू केल्या गेल्या.केवळ शालेय शिक्षणच नव्हे, तर प्रौढ महिलांमध्ये साक्षरता वाढवण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आखण्यात आले.

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दोन दशकांच्या अनुभवानंतर, १९६८ मध्ये पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले. या धोरणाने स्त्री-शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक केला.शिक्षणातील प्रादेशिक आणि सामाजिक विषमता दूर करण्यावर भर देण्यात आला.मुलींच्या शिक्षणासाठी अधिक शाळा आणि महाविद्यालये स्थापन करण्याची शिफारस या धोरणाने केली, जेणेकरून शिक्षण अधिक 'समावेशक' **झाले.**

१९८६ चे सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे स्त्री-शिक्षणाच्या इतिहासातील एक क्रांतिकारी वळण ठरले. या धोरणाने प्रथमच केवळ 'शिक्षण' नव्हे तर 'शिक्षणद्वारे सक्षमीकरण' हा विचार मांडला.महिलांना केवळ साक्षर न करता त्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी विविध व्यावसायिक कौशल्ये शिकवण्यावर भर दिला गेला.ज्या महिलांचे औपचारिक शालेय शिक्षण काही कारणास्तव सुटले होते, त्यांच्यासाठी साक्षरता मोहिमा तीव्र करण्यात आल्या.घरबसल्या शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली, ज्यामुळे गृहिणी आणि नोकरी करणाऱ्या महिलांना आपले शिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळाली. या धोरणांतर्गत सरकारने महिलांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र निधीची तरतूद केली आणि सामाजिक अडथळे दूर करण्यासाठी प्रत्यक्ष हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली.

या सर्व धोरणांमुळे भारतात महिलांच्या साक्षरतेच्या दरात मोठी वाढ झाली. विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय आणि व्यवस्थापन यांसारख्या उच्च शिक्षणाच्या क्षेत्रांत महिलांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला. शिक्षणाने महिलांमध्ये आत्मभान जागृत केले आणि त्यांना देशाच्या आर्थिक व राजकीय प्रक्रियेत सक्रिय भागीदार बनवले.स्वातंत्र्योत्तर काळातील ही धोरणे केवळ कागदावर मर्यादित न राहता, त्यांनी भारतीय स्त्रीच्या आयुष्यात सामाजिक क्रांती घडवून आणली. संविधानापासून सुरू झालेला हा प्रवास १९८६ च्या धोरणापर्यंत अधिक प्रगल्भ झाला, ज्याने आधुनिक भारतीय महिलांच्या यशस्वी कारकिर्दीची भक्कम पायाभरणी केली.

आज भारतीय महिला ज्या विविध क्षेत्रांत यशाची शिखरे पादाक्रांत करत आहेत, त्यामागे या धोरणात्मक बदलांचा मोठा वाटा आहे.

## आधुनिक भारत: धोरणात्मक सुधारणा आणि तांत्रिक क्रांतीचे युग:

गेल्या काही दशकांत भारताने महिला शिक्षणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली आहे. आर्थिक उदारीकरण, मजबूत सरकारी धोरणे आणि तंत्रज्ञानाचा वेगवान विस्तार यांमुळे स्त्रियांसाठी शिक्षणाची कवाडे अधिक रुंदावली आहेत. २००९ मध्ये लागू झालेला 'शिक्षण हक्क कायदा' (Right to Education Act) हा भारतीय शैक्षणिक इतिहासातील एक क्रांतीकारी टप्पा ठरला.या कायद्याने ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला-मुलींसाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण हा मूलभूत अधिकार बनवला.याचा सर्वाधिक फायदा ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना झाला, ज्यांना सामाजिक किंवा आर्थिक कारणांमुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागत होते. यामुळे प्राथमिक स्तरावर मुलींच्या पटनोंदणीत मोठी वाढ झाली.

२०२० मध्ये जाहीर झालेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारतीय शिक्षण व्यवस्थेला आधुनिक आणि समावेशक बनवण्याचे उद्दिष्ट ठेवते.या धोरणात लिंगभेदाचे अडथळे दूर करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. अभ्यासक्रमात बदल करून तो अधिक लिंग-संवेदनशील बनवण्याची आणि शिक्षकांना तसे विशेष प्रशिक्षण देण्याची तरतूद यात आहे. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समाजातील मुलींच्या शिक्षणासाठी विशेष निधी आणि सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे यात नियोजित आहे, जेणेकरून लिंगभेदाचे दुष्टचक्र कायमचे संपुष्टात येईल.

ज्या महिलांना कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे प्रत्यक्ष महाविद्यालयात जाणे शक्य नाही, त्यांच्यासाठी ऑनलाईन कोर्सेस आणि दूरस्थ शिक्षणाचे पर्याय उपलब्ध झाले आहेत. यामुळे उच्च शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधींमध्ये वाढ झाली

आहे.२०१५ मध्ये केंद्र सरकारने सुरू केलेली 'बेटी बचाओ बेटी पढाओ' ही मोहीम केवळ एक योजना नसून ती एक मोठी सामाजिक चळवळ ठरली आहे.या मोहिमेमुळे समाजातील मुलींच्या जन्माबद्दल आणि त्यांच्या शिक्षणाबद्दल असलेल्या नकारात्मक मानसिकतेत मोठा बदल झाला आहे.मुलींच्या शिक्षणातील अडथळे दूर करणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे यावर या मोहिमेने लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यास आणि मुलींचा साक्षरता दर सुधारण्यास मदत झाली आहे.

## स्त्री-शिक्षणातील अडथळे आणि आव्हाने:

महिला शिक्षणाच्या मार्गातील अडथळे हे केवळ शैक्षणिक नसून ते सामाजिक, आर्थिक आणि मानसिक स्वरूपाचे आहेत. भारतीय समाजाच्या अनेक भागांत अजूनही पितृसत्ताक विचारसरणीचे वर्चस्व आहे. यामुळे अनेकदा मुलांच्या शिक्षणाला मुलींच्या शिक्षणापेक्षा अधिक महत्त्व दिले जाते. सामाजिक अपेक्षांनुसार, मुलींनी शिक्षणाऐवजी घरकाम, स्वयंपाक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, असा दबाव त्यांच्यावर असतो. यामुळे त्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेला खीळ बसते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मर्यादित संसाधने उपलब्ध असतात, तेव्हा शिक्षणासाठी प्रथम प्राधान्य मुलाला दिले जाते, कारण तो भविष्यात कुटुंबाचा आर्थिक आधार बनेल, अशी धारणा असते.

अनेक गावांमध्ये माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळा उपलब्ध नसतात. लांबच्या अंतरावरील शाळेत जाण्यासाठी सुरक्षित वाहतूक व्यवस्था नसल्यामुळे, पालकांना मुलींच्या सुरक्षिततेची काळजी वाटते आणि परिणामी मुलींचे शिक्षण बंद केले जाते.प्राथमिक स्तरावर मुलींची नोंदणी वाढली असली, तरी माध्यमिक आणि उच्च शिक्षणापर्यंत पोहोचताना गळतीचे प्रमाण चिंताजनक आहे.शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र आणि स्वच्छ स्वच्छतागृहांची सोय नसणे, हे मुलींच्या शाळा सोडण्यामागचे एक मोठे कारण आहे. मासिक पाळीच्या काळात आवश्यक सुविधा नसल्यामुळे अनेक मुली शिक्षण सोडून देतात.उच्च शिक्षणासाठी शहरात जावे लागल्यास, तिथे सुरक्षित वसतिगृहे किंवा निवासव्यवस्था उपलब्ध नसल्यास पालक मुलींना पाठवण्यास कचरतात.उच्च शिक्षणासाठी लागणारा खर्च आणि त्यानंतर मिळणाऱ्या रोजगाराच्या संधींमधील तफावत यामुळे पालकांना मुलींच्या उच्च शिक्षणात गुंतवणूक करणे 'बिनाफायद्याचे' वाटते. व्यावसायिक अभ्यासक्रमांची महागडी फी अनेक गरीब कुटुंबांना परवडत नाही, ज्यामुळे गुणवंत मुलींनाही आपले शिक्षण सोडावे लागते.

## भविष्यातील वाटचाल:

भारतातील महिला शिक्षणाचा प्रवास एका अशा वळणावर आहे जिथे केवळ साक्षरता वाढवणे पुरेसे नसून, शिक्षणाची गुणवत्ता आणि त्याची व्याप्ती वाढवणे आवश्यक आहे. एक समावेशक आणि सक्षम समाज घडवण्यासाठी आगामी काळात लक्ष केंद्रित करणे आवश्यकआहे.

महिला शिक्षणाचे भवितव्य हे सरकारच्या शाश्वत धोरणांवर आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे. केवळ नवीन कायदे करून चालणार नाही, तर समाजाच्या शेवटच्या थरातील मुलीपर्यंत या योजना कशा पोहोचतील, यासाठी सर्वसमावेशक रणनीती आखणे गरजेचे आहे. यामध्ये मुलींच्या शैक्षणिक गरजा, त्यांची सुरक्षा आणि त्यांना मिळणारे प्रोत्साहन यांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

आर्थिक अडथळे दूर करणे हा महिला शिक्षणातील सर्वात महत्त्वाचा भाग आहे. गरजू आणि गुणवंत मुलींसाठी मोठ्या प्रमाणावर शिष्यवृत्ती योजना आणि आर्थिक मदत उपलब्ध करून दिल्यास उच्च शिक्षणातील त्यांची गळती कमी होईल.पारंपरिक शिक्षणासोबतच महिलांना रोजगारक्षम बनवण्यासाठी विविध कौशल्य विकास आणि व्यावसायिक प्रशिक्षणांवर भर देणे गरजेचे आहे, जेणेकरून त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील.

कोणताही बदल हा केवळ कायद्याने होत नाही, तर तो समाजाच्या मानसिकतेतून घडावा लागतो.मुलींच्या शिक्षणाचे मूल्य पालकांना आणि स्थानिक समुदायाला पटवून देण्यासाठी व्यापक मोहिमा राबवल्या पाहिजेत. पितृसत्ताक पद्धतीतून आलेले सामाजिक पूर्वग्रह दूर करण्यासाठी समाजधुरिण, स्थानिक नेते आणि शिक्षकांची भूमिका कळीची ठरेल. मुलींच्या शैक्षणिक स्वप्नांना आणि महत्त्वाकांक्षेला कुटुंबातून पाठबळ मिळेल, असे पोषक वातावरण निर्माण करणे हे भविष्यातील प्रमुख उद्दिष्ट असावे.

## निष्कर्ष:

भारतातील महिला शिक्षणाची 'पुढील वाटचाल' ही केवळ आकड्यांमधील प्रगती नसून ती स्त्रीच्या आत्मसन्मानाची आणि सक्षमीकरणाची नवी पहाट असावी. जेव्हा समाजातील प्रत्येक मुलगी आपले शैक्षणिक स्वप्न निर्भयपणे पूर्ण करू शकेल,

तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने एक विकसित आणि प्रगत राष्ट्र म्हणून जगात ओळखला जाईल. शिक्षण हेच महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक गुलामगिरीच्या शृंखला तोडण्याचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे.

**संदर्भसूची:**

१.आळतेकर, अ. स. (१९६२). हिंदू संस्कृतीतील स्त्रियांचे स्थान. दिल्ली: मोतीलाल बनारसीदास.
२.कीर, धनंजय (१९७३). महात्मा जोतिराव फुले. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन.
३.कीर, धनंजय (१९७५). राजर्षी शाहू छत्रपती. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन.
४.पाटील, पांडुरंग (संपा.). (१९९८). सावित्रीबाई फुले : जीवन आणि कार्य. पुणे: महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.
५.साळुंखे, आ. ह. (२००४). भारतीय समाजसुधारक आणि स्त्री-शिक्षण चळवळ. पुणे: प्रतिमा प्रकाशन.
६.भागवत, दुर्गा (१९८५). भारतीय संस्कृती आणि स्त्रीचे स्थान. मुंबई: मौज प्रकाशन.
७.करंदीकर, शांता (१९९२). भारतातील स्त्री-शिक्षणाचा इतिहास. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
८.कुलकर्णी, म. ग. (२००१). भारतीय शिक्षणव्यवस्था: इतिहास आणि विकास. नागपूर: विद्या प्रकाशन.
९.जोशी, वि. स. (१९९९). भारतातील सामाजिक सुधारणा चळवळी. पुणे: साकेत प्रकाशन.
१०.सरकार, सुमित (मराठी अनुवाद). (२००२). आधुनिक भारत. पुणे: राजहंस प्रकाशन.
११.महाराष्ट्र शासन. (२०११). जनगणना अहवाल २०११ – साक्षरता आकडेवारी. मुंबई: महाराष्ट्र शासन प्रकाशन.
१२.महिला व बालविकास विभाग, भारत सरकार. (२०१८). बेटी बचाओ बेटी पढाओ: अहवाल व माहिती पुस्तिका (मराठी आवृत्ती).
१३.शिक्षण मंत्रालय, भारत सरकार. (२०२०). राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (मराठी अनुवाद). नवी दिल्ली: भारत सरकार.